# MARATHI

## PAPER—II

## ( LITERATURE )

| Time Allowed : Three Hours | Maximum Marks : 250 |
|---|---|

## QUESTION PAPER SPECIFIC INSTRUCTIONS

**Please read each of the following instructions carefully before attempting questions**

There are EIGHT questions divided in two Sections.

Candidate has to attempt FIVE questions in all.

Question Nos. **1** and **5** are compulsory and out of the remaining, THREE are to be attempted choosing at least ONE question from each Section.

The number of marks carried by a question/part is indicated against it.

Answers must be written in MARATHI.

Word limit in questions, wherever specified, should be adhered to.

Attempts of questions shall be counted in chronological order. Unless struck off, attempt of a question shall be counted even if attempted partly. Any page or portion of the page left blank in the Question-cum-Answer Booklet must be clearly struck off.

## SECTION—A

**1.** पुढील पाच उताऱ्यांचे प्रत्येकी *150* शब्दांत रसास्वादपूर्वक सटीक स्पष्टीकरण करा : 10×5=50

*(a)* ''भटोबासां मागां केतुलेया एका काळा अनोबासांचा हरगर्वी भिक्षा केलेयां हे अवघे आइकौनि म्हणितले : सकळां सवीपरीस का कवि चतुर : मग आपणही श्लोकबंध गद्य केले॥''

*(b)* ''विद्ये विना मति गेली; मती विना नीति गेली; नीती विना गति गेली! गती विना वित्त गेले, वित्ता विना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले.''

*(c)* ''त्याचे प्रेम जडू नये अशीच माझी इच्छा आहे. माझ्यासारखी डाग लागलेली स्त्री त्यांची बायको व्हावयास नको.''

*(d)* ''कां मारी दैव कुठार! कीं उरिं खोल गेली वा तरवार!!
अवचित कुठूनि असा बसला! घाव जिव्हारीं?
तगमग होई! तगमग होई। जाळित काय। सर्वांगास विखार।''

*(e)* ''तू मला नकार द्यायचा हट्ट चालवलास तर मी मग फारच कडवट बनेन. स्त्रीद्वेष्टा, क्यण्ट्यकरस थेरडा, ब्रह्मचारी बनेन.''

**2.** पुढील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी *250* शब्दांत लिहा :

*(a)* 'स्मृतिस्थळ'च्या आधारे तत्कालीन परिस्थितींचा परिचय करून देणाऱ्या संदर्भांची चिकित्सात्मक माहिती द्या. 15

*(b)* प्रस्थापित वर्गव्यवस्थेविषयीचा रोष व्यक्त करताना जोतीराव गोविंदराव फुले यांनी त्यांच्या 'शेतकऱ्यांचा असूड'मध्ये कोणते सकारात्मक मार्ग सुचविले आहेत? 15

*(c)* 'साष्टांग नमस्कार' या नाट्यकृतीद्वारे आचार्य प्रह्लाद केशव अत्रे यांनी प्रयोगशीलता आणि व्यावसायिकता यांचा संगम करून दाखविला, ह्या विधानाचा साधार परामर्ष घ्या. 20

**3.** पुढील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी *250* शब्दांत लिहा :

*(a)* 'ब्राह्मणकन्या' ही कादंबरी वस्तुस्थितीचे चित्रण करीत असताना कचरत नाही, असे म्हणता येईल काय? याविषयीचा साधार परामर्ष घ्या. 15

*(b)* 'जेव्हा मी जात चोरली होती' ह्या कथासंग्रहातील स्त्री-व्यक्तिरेखेसमोर मृत्यूची मान नम्र होते असे म्हणता येते का, हे संदर्भांसह सिद्ध करा. 15

*(c)* प्रह्लाद ईरबाजी सोनकांबळे यांच्या आत्मकथनाद्वारे संयमाचे आणि चिंतनाचे भान ठेवणारी 'आठवणींचे पक्षी' ही साहित्यकृती निर्माण झाली असे खचितपणे म्हणता येते का, याविषयीची साधकबाधक चर्चा करा. 20

4. पुढील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी *250* शब्दांत लिहा :

(a) 'जन हे वोळतु जेथे' ह्या कादंबरीत शरच्चन्द्र मुक्तिबोध यांना भारतीय तत्त्वज्ञान, मनाचे नियंत्रण शिकवते; तर मार्क्सचं तत्त्वज्ञान, जगावर नियंत्रण करून वर्गविरहित समान समाजाचा पुरस्कार करते व ते तसे करणे परस्परविरोधी नाही, असे मांडण्यात यश लाभले आहे काय, ह्याविषयीचा ऊहापोह करा. 20

(b) 'कारावासातून पत्रे', 'मध्य लटपटीत' आणि 'एकेक पान गळावया' अशा तीन कादंबरिका मिळून लिहिली गेलेल्या गौरी देशपांडे यांच्या साहित्यकृतीत व्यक्तिरेखांचे अस्तित्व रोखठोकपणे जाणवत असते, असे तुम्हाला वाटत असल्यास त्यासंबंधीची संदर्भांसह चिकित्सात्मक माहिती द्या. 15

(c) 'शिळान अधिक आठ कथा'मध्ये उद्धव ज० शेळके यांच्या लेखनातील जीवनानुभव साहित्यांतर्गत वास्तव संयमित स्वरूपाचे आहे असे तुम्हाला वाटते का? ह्या प्रश्नाच्या संदर्भात साधार उकल करा. 15

## SECTION—B

5. पुढील पाच पद्यखण्डांची प्रत्येकी *150* शब्दांत रसास्वादपूर्वक सटीक स्पष्टीकरण करा : 10×5=50

(a) नवमास गर्भवासी। कष्ट जाले त्या मातेसी।
ते निष्ठुर जाली कैसी। अंती दूर राहिली।

(b) गजबज बंह् जाली माय धांवोनि आली। धरुनि हृदयदेशीं तीजला सेज केली॥
करिति विजणवारे त्या सख्या वेगळाल्या। वडिलवडिल दाया जाणत्याही मिळाल्या॥

(c) मदनाची मंगलमाया। नटनाच करी हृदयांत;
स्फुरतात कल्पनातीत। रणकार सुखाचे त्यांत.
किति होत नाच नयनांचा। किति रंग मुखावर आलेच
ते चित्त चोर चित्ताला। कितिदां तरि चुकवुनि गेले.

(d) काळाच्या कवि, वालुकेवरि तुवा जी रोवली पावले
नाही दर्शविण्यास शक्त पथ ती कोणा नसो तो तरी
आहे आग जगातली जरि नसे संगीत स्वर्गातले
तत्त्वांचा बडिवारही न अथवा ना गूढशी माधुरी.

(e) "अरे, कविता-बिविता लिहितोस की काय?
छान, छान,
मलासुद्धा गटे आवडायचा."

**6.** पुढील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी *250* शब्दांत लिहा :

*(a)* नामदेवांनी कृष्णकथेच्या मानाने रामकथेचा विस्तार अल्प प्रमाणातच केला आहे, ह्या विधानाचा साधार परामर्ष घ्या. 15

*(b)* रघुनाथपंडित-विरचित 'दमयंतीस्वयंवर' या काव्याची वर्णनशैली ही संस्कृतनिष्ठ आहे, ह्या विधानाशी संबंधित साधार साधकबाधक चर्चा करा. 15

*(c)* म० ना० अदवंत यांनी संपादित केलेल्या 'पैजण' संग्रहातील काव्याविष्काराचे मराठी साहित्येतिहासातील महत्त्व अधोरेखित करा. 20

**7.** पुढील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी *250* शब्दांत लिहा :

*(a)* बालकवींच्या कवितेचे, काव्यानुभवाचे विश्वच वेगळे होते. त्यांनी जसा कुणाचा संप्रदाय स्वीकारला नाही, तसाच त्यांचा संप्रदायही कोणाला आत्मसात करता आला नाही, ह्या विधानाचे औचित्य साधार तपासा. 20

*(b)* 'समिधाच सख्या या' ह्या कवितेद्वारा कुसुमाग्रजांच्या 'विशाखा'तील कवितांची स्वाभाविक प्रकृती निश्चित होते काय, ह्या प्रश्नाच्या आधारे सन्दर्भासह स्पष्टीकरण द्या. 15

*(c)* 'जाहीरनामा'तील कविता म्हणजे व्यक्तिगत सुखदुःखाचे कढ, उमाळे रुंदावून ते समष्टीशी युक्त होताना विश्वात्मकता साधणारी भावात्मकता होय, हे मत कितपत सयुक्तिक वाटते ते सन्दर्भासह स्पष्ट करा. 15

**8.** पुढील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी *250* शब्दांत लिहा :

*(a)* माणिक गोडघाटे 'ग्रेस' यांच्या 'संध्याकाळच्या कवितां'तील 'स्मरणशिल्प' या चौथ्या काव्यगुच्छात 'इन्ग्रिड बर्गमन्' या शीर्षकाची एक कविता म्हणजे ग्रेस यांनी सर्जनशील पूर्वसुरींशी साधलेला संवाद आहे, ह्या विधानाची यथार्थता साधार अधोरेखित करा. 20

*(b)* नामदेव ढसाळांच्या 'या सत्तेत जीव रमत नाही' मध्ये वाचकाला कवीच्या नकारात्मक भूमिकेचा प्रत्यय येतो असे म्हणता येते का? याविषयीची संदर्भांसह चर्चा करा. 15

*(c)* विंदांच्या 'मृद्‌गंध' कवितासंग्रहात गद्याच्या परखडपणासोबत निखालस शारीर अनुभवांतील रसरशीत सत्याला सुरूप देणाऱ्या भावाविष्काराचा प्रत्यय येतो अशा मताविषयीचे उदाहरणांसह विवरण करा. 15

★★★